प्रतिवादी क्र.१३ तर्फे सा.क्र.१ हजर

**सरतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. ए.एन. धैर्य यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

दि.०६/०८/२०२१ रोजी पारुबाई राठोड व विकास राठोड यांनी माझ्या हक्कात मौजे केळगाव येथील सर्वे नं.८८ मधील ६० आर मिळकतीचे खरेदी खत करुन दिले होते. आता मला सदर खरेदीखत दाखवण्यात आले. त्यावर लिहून घेणार म्हणून माझी, लिहून देणार म्हणून पारुबाई व विकास राठोड यांची तसेच साक्षीदार यांच्या सह्या असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२६०** देण्यात येत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.03.25 12:06:24 +0530

दि.२४/०३/२०२६ (**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री. ए.एस. माकणे यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. हे म्हणणे खरे नाही की, मौजे केळगाव व मुबारकपूर येथील मिळकती या शिवाजी राठोड व नामदेव राठोड यांच्या वडीलोपार्जित मिळकती आहेत. हे म्हणणे खरे आहे की, केळगाव येथील मिळकत ही पुर्वी शिवाजीच्या नावावर होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर मिळकत खरेदी करत असताना कोर्टात मिळकतीबाबत वाद प्रलंबित असल्याचे व कोर्टाचा मनाई हुकूम असल्याचे मला माहीत होते. सदर मिळकत पारुबाईच्या नावावर कशाच्या आधारे आली, याबाबत मला माहिती नाही. मिळकत खरेदीपुर्वी ठराव झालेले नव्हते. सदर मिळकत खरेदीपुर्वी मी पेपरमध्ये जाहीर प्रगटन केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, शिवाजी राठोडची भारतबाई ही पत्नी असल्याचे व त्यांना मुले असल्याचे मला खरेदीवेळी माहिती होती. भारतबाई व पारुबाई राठोड यांनी २०१७ साली वारसा प्रमाणपत्र दिवाणी न्यायालयातून काढले होते, याबाबत मला माहिती नाही. भारताबाई ही सुभाष राठोडचे पत्नी असल्याचे मी शपथपत्रात नमूद केले असले तरी सुभाष राठोड कोण आहे याबाबत मला माहिती नाही. दासू राठोडला किती पत्नी व मुले आहेत हे मला माहीत नाही. मिळकत खरेदीपुर्वी मी पारुबाई व्यतिरिक्त मी गावातील इतर लोक व सुरेश चव्हाण यांच्याकडे चौकशी केली होती. पारुबाई व भारतबाईच्या दिराचे नाव सुभाष राठोड होते, याबाबत मला माहिती नाही. शिवाजी राठोडची पहिली पत्नी भारतबाई असून पारुबाई ही दुसरी पत्नी आहे, याबाबत मला माहिती नाही. भारतबाईचे लग्न ४० वर्षापुर्वी उजनी तांडा येथे शिवाजीबरोबर झाले व त्याना वादी क्र.२ ते ७ हे अपत्ये आहेत. शिवाजी राठोडच्या आजोबाचे नाव मला माहीत नाही. मिळकत खरेदीपुर्वी भारतबाई व तिच्या मुलांची संमती मी घेतली नव्हती. सदर दाव्याची माहिती पारुबाई व तिच्या मुलांना होती, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या नावे फेरफार मंजूर झालेला नाही. मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर भारतबाई व तिच्या मुलांची व पारुबाई व तिच्या मुलांच्या नावाची वारसाआधारे नोंद झाली आहे, याबाबत मी काही सांगू शकत नाही. पारुबाईने तिचे नाव तिचे पती वारल्यानंतर भारतबाई त्याविरुध्द अपील केले होते व सदर अपीलाच्या निकालानंतर भारतबाई व तिच्या मुलांची नावे पारुबाई व तिच्या मुलांच्या नावासोबत मिळकतीवर लावण्यात आले होते, याबाबत

मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोर्टाचा मनाई हुकूम असताना मी मिळकत खरेदी केल्यामुळे माझ्याविरुध्द फौजदारी केस दाखल झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर ६० आर जमिनीवर भारतबाई व तिची मुले व पारुबाई व तिची मुले यांचा ताबा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कधीही ६० आर जमिनीचा ताबा मिळालेला नाही तसेच भारतबाईला तिचा हिस्सा मिळू नये म्हणून मी सदर मिळकत माझ्या मालकीचे असल्याचे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ६० आर जमीन शिवाजी राठोड मुळ मालकाकडून खरेदी केल्याचे माझ्या शपथपत्रात खोटे नमूद केले आहे. सदर जमीन खरेदी करतेवेळी मी शिवाजी राठोडचे पारुबाई व तिच्या मुलांव्यतिरिक्त किती वारस आहेत याची चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतीचा पारुबाई व तिची मुले मालक नसताना मी त्यांच्याकडून बेकायदेशीर दस्त करुन घेतले आहे. केळगाव व मुबारकपूर येथील जमिनीमध्ये शिवाजी राठोड व त्याच्या इतर भावामध्ये वाटण्या झालेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, शिवाजी राठोडची पहिली पत्नी भारतबाई असून पारुबाई ही दुसरी पत्नी आहे. मुबारकपूर येथील जमिनीच्या चतुःसीमा मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी व तिच्या मुलाबाबतचे बनावट कागदपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सुभाष राठोडचा मी नमूद केल्याप्रमाणे भारतबाईशी कोणतेही नाते नाही. हे म्हणणे खरे नाही की, ६० आरजमिनीचे खरेदीखत मी भारतबाई व तिच्या मुलाच्या अपरोक्ष करुन घेतल्यामुळे ते त्यांच्यावर बंधनकारक नाही. हे म्हणणे खरे नाही की, केळगाव येथील जमिनीमध्ये भारतबाई व तिच्या मुलांचा व पारुबाई व तिच्या मुलांचा हक्कसंबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की, भारताबाईला ६० आर जमिनीमध्ये हिस्सा मिळू नये म्हणून मी बनावट दस्त करुन घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतीमध्ये वादीला वाटणी मिळू नये म्हणून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी पारुबाईच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.03.25 12:06:30 +0530

दि.२४/०३/२०२६

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.